**प्रेसनोट** **दिनांक २३/१०/२०२६**

# दक्षता जनजागृती सप्ताह-२०२६ (Vigilance Awareness Week)

- दिनांक २६/१०/२०२६ ते ०१/११/२०२६ या कालावधीत **''समृध्दीसाठी सत्यनिष्ठा''** या संकल्पनेवर **''दक्षता जनजागृती सप्ताह-२०२६''** चे आयोजन करण्यात येणार आहेत.

संदर्भ :- १) केंद्रीय दक्षता आयोग,नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र.०२६/वीजीएल/३०, दि.०३/०८/२०२६
२) सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन क्र.दसज-२०२६/प्र.क्र.४५/विचौ-२,
दि.१४/१०/२०२६ अन्वये प्राप्त झालेले परिपत्रक

दिनांक २६/१०/२०२६ ते दिनांक ०१/११/२०२६ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे. सप्ताहा दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

- मुंबई शहरातील विविध कॉलेज, सार्वजनिक कार्यालये/संस्था/ठिकाणे येथे मार्गदर्शन /चर्चासत्राचेचे आयोजन.
- वाहतूक सिग्नलवरील डिजीटल बोर्डावर मेसेजद्वारे दक्षता जनजागृती संदर्भात जाहिरात प्रसारीत करण्यात येणार आहे.
- समाज माध्यमे / एसएमएस / चित्रफितद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे.
- लाप्रवि कार्यालयाचा नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक असलले पोस्टर, हॅण्डबील, भेटकार्ड इत्यादींचे वाटप करून मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यात येणार आहे.
- दक्षता सप्ताह २०२६ मध्ये कलाकार, खेळाडू व नामवंत व्यक्ती यांचेकडून जनतेला आहवान करण्याकरीता व्हिडीओ संदेश क्लीप तयार करण्यात येणार आहे.
- दक्षता सप्ताह दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचे सहयाद्री वाहिनी, आकाशवाणी तसेच खाजगी वृत्त चॅनेल यावर चर्चासत्र तसेच मुलाखत आयोजन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाकडुन नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. जर कोणत्याही शासकीय कामाकरीता शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केली तर नागरीकांनी निर्धास्तपणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागास खालील नमूद क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०.
हेल्पलाईन क्र. : **1064**, दूरध्वनी क्र. : **022-24921212, 24922618**
व्हॉटस् ॲप क्र. : **8828241064**
वेबसाईट : **acb.maharashtra.gov.in**
ईमेल : **acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल : **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**




